# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रेसनोट

- **मालमत्ता कर भरण्याकरीता सर्व कर भरणा केंद्र सकाळी 9.45 ते साय. 6.15 पर्यंत सुरू.**
- **साप्ता. सुट्टी व सार्व. सुट्टीच्या दिवशीही सर्व कर भरणा केंद्र सकाळी 9.45 ते साय. 4.00 पर्यंत सुरू.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत मालमत्ता कर वसुलीसाठी विविध उपाययोजना राबविले जातात. जास्तीत जास्त मालमत्ता कर संकलनाच्या उद्दिष्टपुर्तीच्या दृष्टीने मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे मालमत्ता कराचा भरणा स्विकारण्याच्या वेळेत वाढ करण्यात आली आहे. आता मिरा भाईंदर शहरातील सर्व कर भरणा केंद्र ही कार्यालयीन दिवसात सकाळी 9.45 ते सायं. 6.15 वाजेपर्यंत सुरु राहणार आहेत.

तसेच साप्ताहिक सुट्टी व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी 9.45 ते सायं. 4.00 वाजेपर्यंत नागरीकांना मालमत्ता कर सर्व कर भरणा केंद्रावर भरता येणार आहेत. हा आदेश दि. 31/03/2024 पर्यंत लागू असून शहरातील नागरीकांना सुट्टीच्या दिवशी व त्यांच्या सोईस्कर वेळेत मालमत्ता कर भरणा करता येणार आहे.

मिरा भाईंदर शहरातील नागरीकांना मालमत्ता कर भरण्याकरीता महानगरपालिकेतर्फे विविध उपाययोजना करण्यात येत आहे त्यातच आता कार्यालयीन वेळेत केलेल्या वाढीचा लाभ शहरातील नागरीकांना घेवून लवकरात लवकर मालमत्ता कर भरणा करण्याचे आवाहन महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे.